नि. दि. दा. क्र. ३४८/२०२३
अशोक चिलमे वि. हरीश्चंद्र चिलमे व इतर
नि.क्र. १०९

**प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा उलटतपास वादीतर्फे वकील श्री. ए.एम.निंबुर्गे यांचेमार्फत शपथेवर पुढे सुरुः–**

४. वादग्रस्त जमीन ही हरि चिलमे व अशोक चिलमे यांची आहे. वादी व प्रतिवादी यांच्यात काय वाद आहे हे मला माहिती नाही. गट क्र.३५/१ मध्ये माझी जमीन असलेबाबत मी याकामी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. गट क्र. ३५/१ मध्ये माझी ५ एकर १७ गुंठे जमीन होती व रस्त्यामध्ये २४ गुंठे जमीन गेली. माझे वडील २००७ साली मयत झाल्यानंतर गट क्र. ३५/१ मधील जमीन आम्ही आमच्या तिघा भावांच्या नावावर केली. त्याअनुसार गट क्र. ३५/१ च्या ७/१२ च्या उता–यावर आम्हा तिघा भावांची नावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सन २००७ पर्यंत माझे वडील शेती करीत होते. गट क्र. ३५/१ च्या जमिनीची आमच्या तिघा भावांमध्ये वाटणी झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रामध्ये माझी स्वत:ची जमीन गट क्र. ३५/१ बुधडा मध्ये असून ती वादग्रस्त जमिनीस लगत दक्षिण बाजूस आहे असे खोटे नमूद केलेले आहे. गट क्र. ३५/१ ही जमीन आम्ही तिघा भावाच्या नावाने आहे असे मी सरतपासाचे शपथपत्र तयार करताना माझ्या वकीलांना सांगितले नाही. त्याचे कारण मला सांगता येणार नाही. गट क्र. ३४/ब व गट क्र. ३५/१ मध्ये धुरा आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझे धु–याच्या पलीकडे जाण्याचे कारण नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३५/१ मधील माझे शेत औसा महामार्गास लागून आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला माझ्या शेतात जायचे असेल तर मी महामार्गावरून उतरून शेतात जाऊ शकतो. हे म्हणणे खरे आहे की, मला महामार्गावरून माझ्या शेतात जाता येते म्हणुन १२ फुट रूंदीच्या रस्त्याशी माझा काही संबंध येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा १२ फुट रस्ता मोजण्याचे मला कोणतही कारण नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीच्या सांगण्यावरून त्याठिकाणी १२ फुटाचा रस्ता आहे असे माझ्या सरतपासाच्या शपथपत्रामध्ये नमूद केले आहे.

५. वादी व प्रतिवादी क्र. १ मध्ये वाटणी झाल्यावरून कोणताही कागदोपत्री पुरावा मी पाहिलेला नाही. वादी व प्रतिवादी क्र. १ व २ चे वडील हे १९९० साली वारले त्यावेळेस मी १६ वर्षाचा होतो. वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांचे वडील वारले याबाबत मला कोणीही माहिती दिली नाही. मी याबाबत वाचले होते.

प्रश्न – वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांचे वडील वारल्याबाबत तुम्ही कोठे वाचले होते ?
उत्तर – सदरची बाब मला माझ्या वडीलांकडून कळली.

वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्या भावाचे नाव मला माहिती नाही. ते कधी वारले याची माहिती मला नाही. वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्या ताब्यात गट क्र. ३४/ब मधील जमीन कशी आली याची माहिती मला नाही. गट क्र. ३४/ब चा ७/१२ चा उतारा पाहण्याचा योग मला कधी आला नाही. मला ७/१२ चा उतारा नि.क्र.९२ दाखवले असता त्यावर प्रतिवादी क्र. १ चे नाव आहे. नि.क्र.९२ मध्ये १९९३–१९९४ ते १९९७–१९९८ वहितीच्या रकान्यामध्ये प्रतिवादी क्र. १ चे नाव आहे. गट क्र. ३५/१ च्या ७/१२ च्या उता–यामधील वहितीच्या रकान्यामध्ये माझे नाव आहे त्यामुळे मी सदरची जमीन वहिती करतो असा त्याचा अर्थ होतो. हे म्हणणे खरे नाही की, ७/१२ चा उतारा नि.क्र.९२ मध्ये वहितीच्या रकान्यात फक्त प्रतिवादी क्र. १ चे नाव आहे. सरतपासाचे शपथपत्र देण्यापुर्वी मी प्रतिवादी क्र. १ ला वाटणी कशी ठरली होती याबाबत विचारपूस केली नाही. प्रतिवादी क्र. १ याने वादीस गट क्र. ३४/ब च्या जमिनीचे खरेदीखत करून दिले किंवा नाही याची माहिती मला नाही.

६. वादी व प्रतिवादी क्र. १ व २ चे वडील हयात असताना त्यांनी गट क्र. ३४/ब मध्ये विहीर असल्याबाबत नमूद केले होते याची माहिती मला नाही. प्रतिवादी क्र. १ ने गट क्र. ३४/ब मध्ये विहीर पाडून कॉक्ट्रीकीकरण करण्याचे काम मला दिले नव्हते. प्रतिवादी क्र. १ ने गट क्र. ३४/ब मध्ये विहीर सन २०१५–२०१६ मध्ये पाडली. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ३४/ब मध्ये कोणत्या वर्षी विहीर पाडली व कॉक्ट्रीकरण केले याची माहिती

प्रतिवादी क्र. १ यास आहे. सदर विहीर कधी पाडली या बाबतची कोणाला आहे याची माहिती मला नाही. प्रतिवादी क्र. १ हे पोलीस खात्यामध्ये नौकरीला होते किंवा कसे याची माहिती मला नाही. प्रतिवादी क्र. १ ने दोन बोअर व सबमर्सिबल पंप माझ्या समक्ष घेतलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दोन बोअर घेऊन सबमर्सिबल पंप बसवल्याचे मला प्रतिवादी क्र. १ ने सांगितले.

प्रश्न – तुम्हाला दोन बोअर व सबमर्सिबल पंप बाबत कशी माहिती मिळाली ?

उत्तर – मला दोन बोअर चालू असल्याने माहिती आहे.

७. सदरचे बोअर चालू बंद करण्याची जबाबदारी माझ्याकडे देण्यात आलेली नाही. सदर बोअरचे पाणी मी माझ्या शेताला वापरतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ च्या बोअरची पाईपलाईन माझ्या शेतामध्ये गेली आहे. मी प्रल्हाद चिलमे यास ओळखतो. ते माझे शेतशेजारी आहेत. ते माझ्या उत्तरेकडून शेजारी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही दोघे एकाच वेळेस वकील साहेबाकडे सरतपासाचे शपथपत्र तयार करायला गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ आम्हाला घेऊन वकील साहेबाकडे गेले होतो. मी स्वत:हुन वकील साहेबाकडे सरतपासाचे शपथपत्र देण्याकरिता गेले होतो. प्रतिवादी क्र. १ च्या मुलाने मला प्रतिवादी क्र. १ चे वकील याबाबत सांगितले. प्रतिवादी क्र. १ चा मुलगा पोलीस खात्यामध्ये नौकरी करतो किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. प्रतिवादी क्र. १ च्या मुलाने मला सरतपासाचे शपथपत्र देण्याकरिता बोलवले होते. प्रतिवादी क्र. १ यांचा मुलगा मला व प्रल्हाद चिलमे यांना वकील साहेबाकडे घेऊन गेला होता.

८. मला प्रल्हाद चिलमे यांचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र. ११० दाखवले असता त्यामाधील परिच्छेद क्र. २ व ३ हे माझ्या सरतपसाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. २ व ३ प्रमाणे एकसारखे आहे. (सदर प्रश्नास प्रतिवादीतर्फे वकीलांनी आक्षेप घेतला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार दुस–या साक्षीदार व त्यांच्या सरतपसाच्या शपथपत्रातील मजकुराबाबत सदर साक्षीदारास विचारता येत नाही. दुसरे साक्षीदार प्रल्हाद चिलमे यांचे सरतपासाचे शपथपत्र

नि.क्र.११० आधीच अभिलेखात दाखल असल्याने त्यावर सदर साक्षीदारास प्रश्न विचारता येतो. त्यामुळे त्यांनी घेतलेला आक्षेप ग्राह्य धरता येत नाही.) माझ्या सरतपासातील मजकूर व प्रल्हाद चिलमे यांच्या सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. २ व ३ मधील मजकूर सारखा का आहे याबाबत मला सांगता येणार नाही.

९. प्रतिवादी क्र. १ ने मला माहिती दिली त्यावरून मी वकीलसाहेबाकडून माझे सरतपासाचे शपथपत्र तयार करून घेतले किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2026.03.04 12:25:46 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः–०२.०३.२०२६

दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा